# इंडियन मुस्लिम्स फार सेक्युलर डेमोक्रसी (आयएमएसडी)

# जाहीरनामा

आम्ही भारतीय मुसलमान.

संयुक्त राष्ट्रांच्या सार्वभौम मानवाधिकार जाहीरनाम्यात (1948) तसेच भारतीय संविधानात उल्लेखिलेल्या मूल्यांचा आम्ही पूर्ण आदर करतो.

इस्लामच्या मूलभूत तत्त्वांशी ते पूर्णत: सुसंगतच आहेत असे आम्ही मानतो.

जगातील इतर सर्व धर्मांप्रमाणेच इस्लामही एक बहुशाखीय धर्म होय. आपल्या छत्रछायेतील अल्पसंख्य समुदायांना कायद्याने व प्रत्यक्ष व्यवहारात संरक्षण पुरविणा-या ज्या उदारमतवादी परंपरा इस्लाममध्ये शतकानुशतके चालत आल्या आहेत, त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत.

जो कुणी/जी कुणी स्वतःला मुस्लिम समजतो/ समजते, तो/ती मुस्लिम होय असे आम्ही मानतो. कोण मुस्लिम आहे आणि कोण नाही हे ठरविण्याचा इतरांचा अधिकार आम्हाला मान्य नाही.

**<u>विशेषतः</u>**

- राजकीय बाबी या धर्मापासून वेगळ्याच ठेवल्या पाहिजेत असे आम्हाला वाटते.
- जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत स्त्री-पुरुष समानता आणि न्यायासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
- धर्मभेद, वंशभेद, जातिभेद, भाषाभेद, लिंगभेद आणि लैंगिक कल यांना थारा न देता आम्ही अल्पसंख्यांक, दिव्यांग आणि अभावग्रस्तांच्या मानवाधिकारांचा पुरस्कार करतो.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समानशील संघटना आणि व्यक्तींबरोबर मैत्रीपूर्ण सहकार्य करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.
- आजवर जरी आपली भावना व्यक्त करण्यासाठी योग्य ते व्यासपीठ उपलब्ध झाले नव्हते तरी बहुसंख्य भारतीय मुस्लिम हे या विचारांशी सहमत आहेत असे आम्ही मानतो. आमच्या या व्यासपीठावर त्यांचे स्वागत आहे.
- बहुसंख्य भारतीय हे अनेकतावाद, वैविध्य आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या आदर्शांचे जतन आणि पालन करतात याचा आम्हाला आनंद वाटतो.

**<u>आमची उद्दिष्टे</u>**

आयएमएसडीचे सदस्य या नात्याने आमची पहिली जबाबदारी ही मुस्लिम समुदायाच्या अंतर्गत समस्या सोडविणे ही आहे.

मुस्लिम समाजातील आत्मप्रौढी, भेदभाव, दुराग्रह, असहिष्णुता, अतिरेकीपणा आणि दहशतवाद यांच्याशी लढा देणे;

- स्त्री-पुरुषांसाठी समान न्यायाचा आग्रह धरणे;
- इस्लाममधील उदारमतवादी परंपरांचे पुनरुज्जीवन करून वैविध्याचे स्वागत करणे होय.

चला तर मग, सगळे मिळून ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी झटूया.

---